## नि.दि.मु.क. २०/२०१६ मधील निशाणी क. ०५ वरील आदेश

## अर्जाचे व म्हणण्याचे स्वरूप

१. वादीचा निशाणी क्र. ०५ चा अर्ज वाचला.

२. दावा मिळकतीमध्ये दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी किंवा त्याचेमार्फत नोकर चाकर, नातेवाईक व एंजट यांनी हरकत करू नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी सदरचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे.

३. वादीचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी यांचे वडील संभाजी खुणे यांचे नांवे मौजे चोराखळी, ता.कळंब येथे जमीन गट क्रं. ६८३ मध्ये ३ हेक्टर ५४ आर जमीन आहे. वादी व प्रतिवादीच्या वडीलांच्या मृत्युनंतर वादी, प्रतिवादी व त्यांची आई यांचे नावाचा फेरक्रमांक ९५६ मंजुर झालेला आहे. वादी व प्रतिवादी यांची आई दिनांक २०.०३.१५ रोजी मयत झाली आहे. वरील जमीनी पैकी २४७५ चौरस मीटर क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ साठी संपादीत करण्यात आलेले आहे. वादी व प्रतिवादी यांच्यात जमेनासे झाल्यामुळे त्यांच्यात अक्षय तृतीया २०१५ रोजी वडीलोपार्जीत वरील जागेची वाटणी होवून वादीस प्रतिवादीने गट क्रं. ६८३ मधील १ हेक्टर ६४ आर, आकार रुपये २.२० पैसे ज्याची चतु:सिमा पुर्वेस गट क्रं. ६८५, पश्चिमेस प्रतिवादीची जमीन, दक्षिणेस शिल्पा दत्तात्रय खुणे व श्रीहरी बाजीराव मैंदाड वगैरे यांची जमीन व उत्तरेस राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ प्रत्यक्षात ताब्यात दिली. तेव्हा पासून सदर जमीनीवर वादी मालक कब्जेदार म्हणुन वहीवाट करत आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, सदर जमीनीवर संयुक्त नांवे असल्यामुळे त्यावर पीक कर्ज घेणे, शासकीय योजना राबवणे इत्यादी अडचणी येत आहेत. दिनांक २५.१२.२०१५ रोजी वादी तिच्या शेतामध्ये मेहनत मशागत करत असताना प्रतिवादीने तिच्या जमीनीत अनाधीकाराने प्रवेश करुन अडथळा निर्माण केला. वादी ही महिला असुन तिच्या वडीलोपार्जीत जमीनीमधील कब्जे वहीवाटीस प्रतिवादीने असाच अडथळा केल्यास तिला शेती कसने शक्य होणार नाही व तिच्यावर उपासमारीची वेळ येईल. तसेच वादीचे आर्थीक बाबतीत न मोजता येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

**<u>प्रतिवादीच्या म्हणण्याचे स्वरूप</u>**

**५.** प्रतिवादीने निशाणी क्र. २० कडे वादीच्या तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या अर्जास म्हणणे दिले आहे. त्यात त्याने सदर अर्जातील संपुर्ण मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, वादीचे लग्न ३० वर्षापुर्वी झालेले असुन त्याचा खर्च भाऊ या नात्याने प्रतिवादीने केला आहे. वादी ही तिचे पतीच्या घरी सुखा समाधानाने नांदत आहे. मौजे चोराखळी, ता.कळंब येथील जमीन गट कं. ६८३ मधील ३ हेक्टर ५४ आर जमीनीची चतु:सिमा कैफियती सोबतच्या नकाशा प्रमाणे आहे. सदर जमीनीचे ७/१२ पत्रकी वादी, प्रतिवादी यांच्या नावाच्या सामुहिक नोंदी अदयाप पर्यंत कायम आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सदर जमीनीची तोंडी अथवा लेखी वाटणी झालेली नाही. वादीने दाव्यात दर्शविलेले क्षेत्र व चतु:सिमा काल्पनिक आहेत. वरील जमीनीवर प्रतिवादी हाच एकटा प्रत्यक्षात मालकीने काबीज राहुन उपभोग घेत आहे. प्रतिवादीने मौजे चोराखळी येथील श्रीराम शिंदे यांचेकडुन ४ एकर जमीन वादीचे पती बाळासाहेब चव्हाण यांचे नांवे स्वत: रक्कम देवुन खरेदी करुन दिली आहे. त्यामुळे वादीने वरील जमीनीतील हक्क प्रतिवादीच्या हक्कामध्ये तोंडी सोडुन दिले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**<u>मुद्दे व उत्तरे</u>**

**६.** वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझी उत्तरे त्याखाली नमुद केलेल्या कारणांसाठी पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| | **<u>मुद्दे</u>** | | **<u>उत्तरे</u>** |
|---|---|---|---|
| १ | वादी मागते तशी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेस सकृतदर्शनी स्थिती असल्याचे ती शाबीत करते काय ? | : | <u>...नकारार्थी</u> |
| २ | वादी मागते तशी तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेस सोईचे समतोलत्व तिच्या बाजूने असल्याचे ती शाबीत करते काय ? | : | <u>...नकारार्थी</u> |
| ३ | वादी मागते तशी तुर्तातुर्त मनाई हुकूम नाकारलेस तिचे पैशाने भरुन न येणारे नुकसान होईल असे ती शाबीत करते काय ? | : | <u>...नकारार्थी</u> |
| ४ | काय आदेश? | : | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## मान्य बाबी

७. वादी व प्रतिवादी हे नात्याने सख्खे बहिण भाउ असुन वादी व प्रतिवादी यांचे वडील संभाजी बाबु खुणे हे मयत आहेत याबाबत दोन्ही पक्षकारामध्ये वाद नाहीत.

## मुद्‌दा क्र. १ ते ३ संबंधी कारणमिमांसा

८. तुर्तातूर्त मनाई हुकुमाचा अर्ज निर्णयीत करताना प्रथमदर्शनी बाजू कोणाच्या हक्कात आहे, अनुकूलतेचा कल कोणाच्या बाजुने आहे व अपरिमीत नुकसान कोणाचे होणार आहे एवढेच पाहणे गरजेचे असते. याकरीता सखोल पुराव्यात जाण्याची गरज नसते. तुर्तातूर्त मनाई हुकुमाचा आदेश मिळण्याकरीता संबंधीत इसमाने आपल्या मागणीमध्ये कायद्याचे समन्याय हे तत्व दर्शवून देणे गरजचे असते. उपरोक्त सर्व मुद्ये एकमेकांवर विसंबून असल्यामुळे त्या सर्वांचे एकत्रीतरित्या विवेचन केलेले आहे.

९. वादी व प्रतिवादी यांचा आलेला तोंडी व वादीचा कागदोपत्री पुरावा, त्यांच्यातर्फे करण्यात आलेल्या युक्तिवादाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मौजे चोरखळी, ता. कळंब येथील जमीन गट नंबर ६८३ संदर्भाने दाखल सन २०१४-१५ चा ७/१२ उतारा निशाणी क्र. ७ पाहता त्यावर वादी, प्रतिवादी व त्यांची आई रूपाबाई संभाजी खुने यांच्या नावाची नोंद सहमालक म्हणून संयुक्तरित्या फेरफार क्र. ९५६ नुसार लागल्याचे स्पष्ट दिसून येते. प्रकरणात दाखल इतर कागदपत्र पाहता वादी व प्रतिवादीची आई रूपाबाई संभाजी खुने यांचा मृत्यू दिनांक २२.०३.२०१५ रोजी झाला असून त्यांना वादी व प्रतिवादी हेच वारस असल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे एक बाब स्पष्ट होते की, मौजे चोरखळी, ता. कळंब येथील जमीन गट नंबर ६८३ मधील क्षेत्रावर वादी सोबतच प्रतिवादी याचे देखील हक्कसंबंध असून सद्य:स्थितीत वरील मिळकतीवर ते दोघे सहमालक नात्याने सहहिस्सेदार म्हणुन काबीज असल्याचे दिसतात.

१०. वादी व प्रतिवादी हे नात्याने सख्खे बहीण भाऊ आहेत. वादीने तिच्यात व प्रतिवादीमध्ये वरील मिळकतीबाबत अक्षय तृतीया २०१५ रोजी वाटप झाल्याचे कथन केले असले तरी, त्यांच्या वडीलार्जीत वरील मिळकतीत सहहिस्सेदारांमध्ये सरस निरस मानाने वाटप झाल्याबाबत कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे जेव्हा मौजे चोरखळी, ता. कळंब येथील जमीन गट नंबर ६८३ ही मिळकत वादी व प्रतिवादीच्या एकत्र कुटूंबाच्या वडीलार्जीत मालकी वहिवाटीची असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे, तेव्हा,

जोपर्यंत वरील मिळकतीत त्यांच्यात वाटप होत नाही तोपर्यंत वादीला प्रतिवादी या सहहिस्सेदाराचा त्यातील अधिकार डावलता येणार नाही.

११. थोडक्यात, वादीच्या बाजुने सकृतदर्शनी स्थिती असल्याचे स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द वादीला तात्पुरता मनाई हुकुम मागण्यास सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत होत नाही. वादीचा वरील मिळकतीत प्रतिवादी या सहहिस्सेदारासोबत सामाईक ताबा असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे हे प्रस्थापित आहे की, एका सहमालकास दुस-या सहमालकाविरुध्द वडीलार्जीत मिळकतीत हरकत करू नये अशी तुर्तातुर्त मनाई कायदयाने मागता येणार नाही. त्यामुळे नैसर्गिकरित्या वादी मागते तशी तुर्तातुर्त मनाई मिळणेस सोईचे समतोलत्व वादीच्या बाजूने असल्याचे निर्विवादपणे शाबीत होत नाही. वादी मागते तशी तुर्तातुर्त मनाई नाकारलेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही. तसेच तिच्या वरील मिळकतीतील सामाईक मालकी वहिवाटीस काहीही धोका पोहचणार नाही. उलटपक्षी, वादी मागते तशी मनाई दिलेस त्या जोरावर ती वरील मिळकतीत त्यांच्यात वाटप झालेले नसताना प्रतिवादी या सहहिस्सेदाराच्या कायदेशिर अधिकारास बाधा निर्माण करेल. त्यामुळे वादीच्या व प्रतिवादीच्या कायदेशीर अधिकारांचा विचार करुन वादीचे हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम देणे न्यायोचीत होणार नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व्दारे या न्यायालयास निहित करण्यात आलेल्या अंगभूत शक्तीचा वापर करुन वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूम संबंधीचा हा अर्ज नामंजुर होणे योग्य व न्यायोचित होईल असे माझे ठाम मत आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी देत असुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. वादीचा नि.नं. ०५ चा अर्ज नामंजुर करणेत येत आहे.

२. वादीच्या या अर्जाचा खर्च मूळ वाद खर्चात समाविष्ट होईल.

( खुले न्यायालयात अधिघोषित )

स्वा/-
( प्रि.म.पाटील )
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
कळंब.

कळंब
दिनांक : १८.०४.२०१८